| MHGA110000672026 | दाखल दिनांक | १३.०२.२०२६ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | १३.०२.२०२६ |
| | निकाल दिनांक | ०७.०४.२०२६ |
| | कालावधी | ००वर्षे, ०१ म., २२ दि. |

**<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कुरखेडा यांचे न्यायालय, जिल्हा –गडचिरोली</u>**

(पीठासीन अधिकारी– एन. पी. देशपांडे)

**<u>एम.जे.सी. क्र. ०९/२०२६</u>**

**१. शकिल अहेमद अब्दुल हकिम शेख,**
वय :– ६६ वर्षे, धंदा – व्यवसाय,
राहणार – आझाद वार्ड कुरखेडा,
जिल्हा – गडचिरोली. .. **<u>अर्जदार</u>**

**<u>विरुध्द</u>**

**निरंक** ... **<u>गैरअर्जदार</u>**

**<u>मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम ३ अन्वये अर्ज</u>**

---

अर्जदारांतर्फे विद्वान अधिवक्ता – श्री. जि.एम. नागमोती
गैरअर्जदार – निरंक

---

## <u>आदेश निशाणी क्रमांक ०१ वर पारीत</u>

(दिनांक ०७ एप्रिल, २०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने तो मयत अब्दुल हकीम ईमाम शेख यांचे वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी केलेला होता.

२. अर्जातील कथन की, मयत अब्दुल हकीम ईमाम शेख हे दिनांक ०४.०८.१९९६ रोजी मौजा कुरखेडा येथे आजारामुळे मरण पावले. अर्जदार हा मयताचा मुलगा असल्या कारणाने वारस आहे. अर्जदाराची आई म्हणजेच मयत अब्दुल

हकीम ईमाम शेख यांची पत्नी नामे शरिफुन्नीसा अब्दुल हकीम शेख ही दिनांक ०४.०८.१९८८ रोजी कुरखेडा येथे आजारामुळे मरण पावली आहे. अर्जदाराशिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. त्यामुळे अर्जदारांनी मयताचे पश्चात शासकीय व निमशासकीय कामाकरीता अडचणी येवू नये म्हणून वारस दाखलाची आवश्यक्ता आहे. सबब, अर्जदाराने मयत अब्दुल हकीम ईमाम शेख यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्याची मागणी केली आहे.

३. अर्जदारांतर्फे अर्जदार शकिल अहेमद अब्दुल हकिम शेख याचा निशाणी १० खाली अर्जातील कथनाचे पुष्ठयर्थ तोंडी पुराव्याचे शपथपत्र दिले आहे. त्याने त्याचे वडील अब्दुल हकीम इमाम शेख यांचे निबंधक, (जन्म-मृत्यु नोंदणी), नगर पंचायत कुरखेडा यांनी निर्गमीत केलेले मृत्यु प्रमाणपत्र (नि.क्र.११), त्याची आई मयत शरीफुनिस्सा अब्दुल हकीम शेख हिचे निबंधक, (जन्म-मृत्यु नोंदणी), नगर पंचायत कुरखेडा यांनी निर्गमीत केलेले मृत्यु प्रमाणपत्र (नि.क्र.१२), त्याचे आधारकार्डचे पडताळणी केलेली प्रत (नि.क्र.१३), अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत नगरसेवक कुरखेडा यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र (नि.क्र.१४) इत्यादी कागदपत्रे दाखल केले आहेत.

४. अर्जदार शकिल अहेमद अब्दुल हकिम शेख याचे तोंडी पुराव्याचे शपथपत्र व उपरोक्त कागदोपत्री पुरावा यांचे एकत्रीत अवलोकन केले असता मयत अब्दुल हकीम इमाम शेख यांचे दिनांक ०४.०८.१९९६ रोजी मौजा कुरखेडा येथे निधन झाले आहे. अर्जदार हा त्यांचा मुलगा या नात्याने वारस आहे. अर्जदारांनी 'दैनीक नवराष्ट्र' दि.२८.०२.२०२६ रोजी जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. परंतु, सदरचा जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आल्यापासून आजपर्यंत कोणीही अर्जदाराच्या उपरोक्त अर्जास हरकत नोंदविली नाही. न्यायालयासमोर दाखल केलेल्या कागदपत्रांचे व अर्जदार शकिल अहेमद अब्दुल हकिम शेख याचे शपथपत्र नि.क्र.१० मधील कथनाचा विचार करता हे न्यायालय या निष्कर्षास आले आहे की, अर्जदार हा मयत अब्दुल हकीम इमाम शेख यांचे कायदेशीर वारस आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषगांने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार **शकिल अहेमद अब्दुल हकिम शेख** हा मयत अब्दुल हकीम ईमाम शेख (मृत्यु दि. ०४.०८.१९९६) याचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदारांनी योग्य तो न्यायालयीन शुल्क जमा केल्यानंतर उत्तराधिकारी दाखला देण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात आदेश घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.04.07 18:07:01 +0530

(एन. पी. देशपांडे)

स्थळ : कुरखेडा.
दिनांक : ०७.०४.२०२६

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,
कुरखेडा.